तांत्रिक मान्यता प्रदान करताना प्रशासकीय मान्यतेतील सर्व बाबी पूर्ण व्याप्तीसह अंतर्भूत करणेबाबत मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : बीडीजी-२०२६/प्र.क्र.१३८/इमा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २६ ऑक्टोबर, २०२६

वाचा:- शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२१०/इमा-३, दि.०८.११.२०२३

प्रस्तावना:-

मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीकडे बांधकामाचे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात येऊन समितीने मंजुरी दिलेल्या प्रस्तावांना प्रशासकीय विभागामार्फत प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येते. तथापि, क्षेत्रीय स्तरावर उच्चाधिकार समितीकडून मंजूर केलेल्या मूळ नकाशा व आराखड्यामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे प्रशासकीय मान्यतेच्या मंजूर किमतीपेक्षा अधिक किमतीची तांत्रिक मान्यता प्रदान करणे, अथवा प्रशासकीय मान्यतेच्या किमतीत प्रकल्प बसवण्यासाठी जाणीवपूर्वक काही बाबी (उदा. संरक्षक भिंत, रस्ते, फर्निचर इ.) वगळून उर्वरित बाबींसाठी तांत्रिक मान्यता दिली जात आहे. यामध्ये वाढीव क्षेत्रफळांचे बांधकाम, विनिर्देशांमधील बदल (Changes in Specifications), आभासी छत, अंतर्गत रस्ते, अतिरिक्त वातानुकूलीत यंत्रणा, रोहीत्र संच इ. सारख्या अतिरिक्त बाबी संबंधित उपभोक्ता विभागाच्या लेखी मान्यतेशिवाय अंतर्भूत करण्यात येतात. यामुळे इमारत प्रशासकीय मान्यता रकमेत पुर्ण होऊ शकत नाही व परिणामी उपभोक्ता विभागास अडचणींचा सामना करावा लागतो.

उच्चाधिकार समितीच्या बैठकीत देखील याबाबत चर्चा झाली असून, समितीने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, काही प्रकरणांत संबंधितांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देशही दिले आहेत. यापूर्वी संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि सदर सूचनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास येत असल्याने, याबाबत मार्गदर्शक सूचना प्रसृत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

परिपत्रक:-

इमारतीच्या बांधकामांना तांत्रिक मान्यता प्रदान करताना खालील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहे.

१. इमारत बांधकामांना प्रशासकीय मान्यतेतील मंजूर किमतीपेक्षा अधिक किमतीची अथवा अपूर्ण व्याप्तीची तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात येऊ नये.

२. प्रशासकीय मान्यतेतील काही बाबी वगळून, उर्वरित बाबींचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेच्या मंजूर किमतीत बसविण्याच्या उद्देशाने तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात येऊ नये. परिणामी प्रकल्पाची अंतिम किंमत प्रमाणाबाहेर वाढते. तसेच, कामाची बहुतांश व्याप्ती पूर्ण झाल्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव उच्चाधिकार समितीसमोर सादर केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे इमारतीचा विहित वेळेत वापर होऊ शकत नाही आणि शासकीय निधीचे योग्य नियोजनही होत नाही.

३. तांत्रिक मान्यतेसाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकाची किंमत प्रशासकीय मान्यतेच्या मंजूर किमतीपेक्षा अधिक असल्याचे निदर्शनास आल्यास, सदर बाब तात्काळ शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. तसेच, मूळ प्रशासकीय मान्यता रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करून नवीन प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यासाठी सुधारित प्रस्ताव सादर करण्यात यावा. अशा प्रकरणांमध्ये नवीन प्रशासकीय मान्यता प्राप्त होईपर्यंत अपूर्ण कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊ नये.

४. मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांनी निरीक्षण टिपणी निर्गमित करताना विनिर्देशांमधील बदल (Changes in Specifications), प्रमाण किंवा कामाची व्याप्ती यात बदल करताना कामाच्या मंजूर प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच सदर बदल करणे आवश्यक असल्यास त्याबाबत संबंधित उपभोक्ता विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव यांची लेखी मान्यता घेण्यात यावी.

५. प्रशासकीय मान्यतेच्या किमतीत व्याप्ती पुर्णपणे संपून काम हस्तांतरित होईल, अशी खात्री करण्याची जबाबदारी तांत्रिक मान्यता प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्याची राहील.

उपरोक्त नमूद सूचनांचे तांत्रिक व आर्थिक शिस्तीच्या अनुषंगाने सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे पालन करावे. सदर सूचनांचे उल्लंघन करून सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव मंजुरीस्तव शासनास प्राप्त झाल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधीतांविरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६१०२६१७०७५८९०१८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAYUR BAPU VASAVE

Digitally signed by MAYUR BAPU VASAVE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PWD, 2.5.4.20=068B9E225037ECED3A15E3390EC2214C6C49F3E0BC5D692D2654DCF84CB5A668, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9100AC52BA93C90E89D909C3BC1A50868D778E6D2400597ACA255C0DEB3DB71E, cn=MAYUR BAPU VASAVE
Date: 2026.10.26 17:08:51 +05'30'

(मयुर वसावे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई.

४. सचिव (बांधकामे), सा.बां. विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (रस्ते), सा.बां. विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा. बां. विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ.
९. सर्व अधीक्षक अभियंता (विद्युत), विद्युत (सा.बां.) मंडळ.
१०. सर्व कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग.
११. कार्यासन अधिकारी इमा.२ (निवडनस्ती).